


वर्ष - 9 । अंक -37 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™




आज सातवी माळ
ालरात्री देवी


**आतील पानांत**

- शीतल, तोमनचे ऐतिहासिक 'सुवर्ण'यश
- सूर्याचं वक्तव्य, प्लेन क्रॅश हातवारे
- तमिळनाडूतील चेंगराचेंगरीत ३६ मृत्यू
- वांगचुक यांच्या पाकिस्तानशी संबंधा



www.mahaenews.com । रविवार, दि. 28 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## उपोषणाचा आज 11 वा दिवस

### मुख्यमंत्री फडणवीसांची बोऱ्हाडेंशी फोनवरून चर्चा

# धनगर आरक्षणाचा मुद्दा तापला!

### मंत्री गिरीष महाजन यांच्यासह सरकारचे शिष्टमंडळ दिपक बोऱ्हाडे यांच्या भेटीला

**। जालना । प्रतिनिधी ।**
**महाईन्यूज**

**जालन्यात दीपक बोऱ्हाडे आमरण अपोषणाला बसले आहेत. धनजर समाजाला एसटीतून आरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागणीनंतर आता फडणवीस यांनी त्यांच्याशी फोनद्वारे चर्चा केली आहे. मराठा आरक्षणानंतर आता राज्यात सध्या धनगर आरक्षणाचा मुद्दा तापलेला आहे. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे, अशी मागणी केली जात आहे.**



हीच मागणी घेऊन सध्या जालना जिल्ह्यात दीपक बोऱ्हाडे उपोषणाला बसले आहेत. गेल्या दहा ते बारा दिवसांपासून त्यांचे उपोषण चालू असून आता राजकीय वातावरण तापले आहे. दरम्यान, आता त्यांच्या उपोषणावर योग्य तो तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच थेट दीपक बोऱ्हाडे यांच्याशी फोनद्वारे संवाद साधला आहे. एसटीच्या आरक्षणासाठी केंद्र सरकारला अहवाल द्यावा लागतो. मी तुम्हाला पत्र देतो. चर्चा करण्यासाठी तुम्ही माझ्याकडे या, असे आवाहन फडणवीस यांनी दीपक बोऱ्हाडे यांना दिले आहे. तसेच दीपक बोऱ्हाडे यांनी उपोषण मागे घ्यावे, असेही आवाहन फडणवीस यांनी केले आहे एव्हढेच काय तर सरकारच्या शिष्टमंडळाने बोऱ्हाडे यांची भेट घेतली. व बोऱ्हाडे यांना उपोषण सोडण्याची विनंती करण्यात आली आहे. .

**देवेंद्र फडणवीस यांचे बोऱ्हाडे यांना आवाहन**

दीपक बोऱ्हाडे यांनी आपले उपोषण मागे घ्यावे यासाठी त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी सरकारचे शिष्टमंडळ दीपक बोऱ्हाडे याच्या भेटीला पोहोचले.

## उपोषण सोडण्याची विनंती

दरम्यान यावेळी बोलताना गिरीश महाजन यांनी बोऱ्हाडे यांना उपोषण सोडण्याची देखील विनंती केली आहे. इतकं दिवस उपोषण केलं, आता लांबून चालणार नाही कारण आपल्याला समाजाला न्याय द्यायचा आहे. त्यामुळे आम्हाला सुद्धा असं वाटतं की आपण उपोषण सोडलं पाहिजे, माझी आपल्याला विनंती आहे की आपण आता या ठिकाणी उपोषण सोडावं, अशी विनंती महाजन यांनी बोऱ्हाडेंना केली.

यावेळी दीपक बोऱ्हाडे यांचे मत या शिष्टमंडळाने जाणून घेतले. तसेच प्राथमिक चर्चा झाल्यानंतर मंत्री पंकजा मुंडे यांनी बोऱ्हाडे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून बोलणे करून दिले. यावेळी फडणवीस यांनी बोऱ्हाडे यांनी माझ्याशी चर्चा करायला यावे, असे आवाहन केले. तसेच एसटीतून आरक्षण देण्यासाठीची कायदेशीर प्रक्रियाही सांगितली.

> "दीपक भाऊ यांच्या उपोषणाचा आजचा अकरावा दिवस आहे, खरं म्हणजे आम्ही लवकर यायला पाहिजे होतं. पण मागील काही दिवसापासून राज्यातील परिस्थिती आपण पाहातात, पावसाचं खूप मोठं संकट आहे. सगळीकडून आम्हाला फोन येत आहेत, मी जळगाव दौरा आटपून येत असताना मला देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला, आता तुम्ही जालन्याला जा असं त्यांनी मला सांगितलं. आमची प्रामाणिक इच्छा आहे, देवा भाऊंनी प्रयत्न केले, मात्र अनेक दिवसापासून र आणि ड चा विषय सुरू आहे. आपल्यावरचा हा अन्याय दूर करायचा आहे आणि तो झालाच पाहिजे. परंतु थोडा वेळ लागत आहे. ही वस्तुस्थिती आहे.
>
> **-गिरीश महाजन,**
> **जलसंसाधन मंत्री, महाराष्ट्र राज्य**



**फडणवीस नेमकं काय म्हणाले?**

बोऱ्हाडे यांच्याशी फोनवर बोलताना, कोणीही काहीही बोलू द्या. मी काहीही लिहून दिलं तरी जोपर्यंत मी चर्चा करत नाही तोपर्यंत मार्ग निघणार नाही. तुम्हालाही माहिती आहे की लोकांनी केसेस केल्या आहेत. आपण आरक्षणाबाबत आपण आपली बाजू मांडली. सर्वोच्च न्यायालयामुळेही यात अडचणी निर्माण झाल्या. एसटीचे आरक्षण केंद्र सरकार राष्ट्रपतींच्या मान्यतेने देते. त्यासाठी राज्य सरकारला अहवाल द्यावा लागतो. मागच्या सरकारने धनगर समाज एसटीत बसत नाही, असा अहवाल पाठवला. मराठा आरक्षणासाठी एसटीच्या आरक्षणासाठी कायदा करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केलेली एक यंत्रणा आहे. पाच ते संस्था एकत्र येऊन एक अहवाल सादर करतात. त्यानंतर केंद्र सरकारचा जनजाती आयोग त्यावर एक रिपोर्ट तयार करतो. याच रिपोर्टच्या आधारावर नंतर केंद्र सरकार आरक्षणाचे वर्गीकरण करते, असे फडणवीस यांनी सांगितले.

**संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय आरक्षण...**

तसेच, मी म्हणतोय की आपण चर्चा केली तर मार्ग निघेल. आरक्षण अजूनही आपल्याला हातून गेलेलं नाही. तुम्ही चांगला वकील बसवू. तुम्ही प्रक्रिया समजून घ्या. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय आरक्षण मिळू शकतात नाही. एसटीचे संवैधानिक आरक्षण आहे. त्यामुळे त्याची एक प्रक्रिया आहे. तुम्ही चर्चा करा आपण मार्ग काढू, असे आवाहनही त्यांनी केले. गेल्या दहा दिवसांपासून जालन्यात दिपक बोऱ्हाडे यांचं उपोषण सुरू आहे, राज्यात सध्या आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे, धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळावं या मागणीसाठी दिपक बोऱ्हाडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

**साडेसात लाखांचा दंड वसूल**

## व्हॅन चालकांकडून साडेसात लाखांचा दंड वसूल

# धोकादायक वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई

## शहरातील ३२७ वाहनांची तपासणी

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**विद्यार्थ्यांची अवैध आणि धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या बस, इको व्हॅन, रिक्षाचालकांवर पिंपरी-चिंचवड पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कारवाईचा दंडुका उगारला. विशेष मोहिमेंतर्गत शहरातील ३२७ वाहनांची तपासणी करून धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या २०५ बस, रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई केली. त्यांच्याकडून सात लाख ६९ हजार ७५० रुपये दंड वसूल करण्यात आला.**



### सूचनांचे पालन करत नाहीत

शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या बस, व्हॅन, रिक्षा धोकादायक पद्धतीने वाहतूक करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. काही बसचालक नियमांचे आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या सूचनांचे पालन करत नाहीत. काही वेळा वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना बसविले जातात. धोकादायक पद्धतीने विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या वाहतुकीबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाकडे नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या.

पिंपरी-चिंचवड शहरात शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या बस, व्हॅन, रिक्षा धोकादायक पद्धतीने वाहतूक करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. काही बसचालक नियमांचे आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या सूचनांचे पालन करत नाहीत. काही वेळा वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना बसविले जातात. धोकादायक पद्धतीने विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या वाहतुकीबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाकडे नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या.'नागरिकांच्या तक्रारींनंतर वाहतूक आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्या चार वायुवेग पथकांमार्फत तपासणी करण्यात आली. पिंपरी, भोसरी, चाकण, वाकड, निगडी आणि हिंजवडी वाहतूक विभागाच्या हद्दींमध्ये कारवाई करण्यात आली. एकूण १७० बस आणि १५७ व्हॅन आणि रिक्षांची तपासणी करण्यात आली.त्यापैकी शालेय विद्यार्थ्यांची अवैध आणि धोकादायक पद्धतीने ने-आण करणाऱ्या ७० बस आणि १२८ व्हॅन, रिक्षांवर कारवाई करण्यात आली. चालकांकडून सात लाख ६९ हजार ७५० रुपये दंड वसूल केला गेला,' असे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी सांगितले.विद्यार्थ्यांची अवैध आणि धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या बस, इको व्हॅन, रिक्षाचालकांवर पिंपरी-चिंचवड पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कारवाईचा दंडुका उगारला. विशेष मोहिमेंतर्गत शहरातील ३२७ वाहनांची तपासणी करून धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या २०५ बस, रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई केली. त्यांच्याकडून सात लाख ६९ हजार ७५० रुपये दंड वसूल करण्यात आला.

पिंपरी-चिंचवड शहरात शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या बस, व्हॅन, रिक्षा धोकादायक पद्धतीने वाहतूक करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. काही बसचालक नियमांचे आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या सूचनांचे पालन करत नाहीत. काही वेळा वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना बसविले जातात. धोकादायक पद्धतीने विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या वाहतुकीबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाकडे नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या.'नागरिकांच्या तक्रारींनंतर वाहतूक आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्या चार वायुवेग पथकांमार्फत तपासणी करण्यात आली. पिंपरी, भोसरी, चाकण, वाकड, निगडी आणि हिंजवडी वाहतूक विभागाच्या हद्दींमध्ये कारवाई करण्यात आली. एकूण १७० बस आणि १५७ व्हॅन आणि रिक्षांची तपासणी करण्यात आली.त्यापैकी शालेय विद्यार्थ्यांची अवैध आणि धोकादायक पद्धतीने ने-आण करणाऱ्या ७० बस आणि १२८ व्हॅन, रिक्षांवर कारवाई करण्यात आली. चालकांकडून सात लाख ६९ हजार ७५० रुपये दंड वसूल केला गेला,' असे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी सांगितले.विद्यार्थ्यांची अवैध आणि धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या बस, इको व्हॅन, रिक्षाचालकांवितपासणी करून धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या २०५ बस, रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई केली. त्यांच्याकडून सात लाख ६९ हजार ७५० रुपये दंड वसूल करण्यात आला.

# विद्यापीठाच्या घसरणीचे पडसाद

## क्रमवारी घसरल्याबाबत 30 सप्टेंबरच्या अभिसभेत चर्चा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रीय संस्थात्मक मानांकन आराखड्यात (एनआयआरएफ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्थान घसरल्याचे पडसाद विद्यापीठाच्या अधिसभेत उमटतील. क्रमवारीतील विद्यापीठाच्या घसरणीबाबत अभिसभा सदस्यांनी विविध मुद्दे उपस्थित केले असून, घसरणीची कारणे शोधण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमण्याचा ठराव मांडण्यात आला आहे.**



### सुधारणेसाठी समिती नियुक्त

एनआयआरएफ क्रमवारीतील विद्यापीठाची घसरण रोखण्यासाठी प्रत्येक विभागासाठी मॉनिटरिंग डॅशबोर्ड तयार करून नियमित आढावा घेण्यात यावा, त्यानुसार सुधारात्मक पावले उचलण्याची शिफारस डॉ. योगेश भोळे यांनी केली आहे. विद्यापीठाच्या क्रमवारीतील सुधारणेसाठी समिती नियुक्त करण्याचा ठराव राहुल पाखरे यांनी मांडला आहे.

विद्यापीठाची अधिसभा २० सप्टेंबर रोजी आयोजिण्यात आली आहे. यात विविध प्रशासकीय, आर्थिक मुद्द्यांवर चर्चा केली जाणार आहे.त्यासाठीची कार्यक्रम पत्रिका अंतिम करण्यात आली असून, त्यानुसार एनआयआरएफ क्रमवारीत विद्यापीठाचे स्थान ३७व्या क्रमांकावरून ९१व्या स्थानापर्यंत घसरल्याबाबतची चर्चा केली जाणार आहे. अधिसभा सदस्य डॉ. अपर्णा लळिंगकर, दादाभाऊ शिनलकर, राहुल पाखरे यांच्यासह अनेक सदस्यांनी या विषयावर ठराव मांडले आहेत.एनआयआरएफ क्रमवारीत झालेल्या घसरणीमुळे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील ओळखीला धक्का बसला आहे. नेमक्या कोणत्या कारणांमुळे ही घसरण झाली, हे समजून घेणे आवश्यक आहे, अशी भूमिका सदस्यांनी मांडली आहे. त्या अनुषंगाने डॉ. अपर्णा लळिंगकर यांनी तज्ज्ञ समिती स्थापन करून चार महिन्यांत समितीने अहवाल सादर करावा आणि त्यातील शिफारशींची त्वरित अंमलबजावणी करावी, असा ठराव मांडला आहे. आयआयटीसारख्या नामांकित संस्थांमधील तज्ज्ञ, माजी विद्यार्थी, संलग्न संस्थांतील प्रतिनिधी यांचा समितीत समावेश असावा

स्वच्छ भारत अभियान

दीडशे हाऊसिंग सोसायट्यांमध्ये

# ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती!

## घनकचरा व्यवस्थापनात दिवसाला जिरवला जातोय ३८.६७ मेट्रिक टन कचरा

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**स्वच्छ भारत अभियानामध्ये घनकचरा व्यवस्थापनात नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून भर दिला जात आहे. महापालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील १५० मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांकडून निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. या सोसायट्यांकडून प्रत्येक दिवसाला ३८.६७ मेट्रिक टन ~~कचरा जिरवला जात असून,~~ त्यापासून खतनिर्मिती केली जात आहे.**



लोकसंख्येप्रमाणे कचराही दिवसेंदिवस वाढत आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध जागा कमी पडते. त्यामुळे जैवविघटनशील कचऱ्याचे विघटन करण्याचा प्रयत्न केला जातो. शहरात तयार होणाऱ्या सेंद्रिय घटक आहेत. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सेंद्रिय पद्धतीचा वापर केला जातो. सेंद्रिय कचऱ्याच्या विघटनाची नैसर्गिक प्रक्रिया म्हणजे कंपोस्ट खत तयार करणे आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये कंपोस्टिंगबाबत जनजागृती केली जात असल्याचे आरोग्य विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

नागरिकांना तसेच मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांना आवारामध्ये ओल्या कचऱ्याची कंपोस्टिंगच्या माध्यमातून विल्हेवाट लावण्याचे आवाहन केले जाते. शहरातील सोसायटीधारकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. अनेक सोसायटीत त्यांच्या आवारातच घनकचरा जिरवला जात आहे. सुमारे १५० सोसायट्यांमध्ये प्रतिदिन

> “ जास्तीत जास्त सोसायट्यांना सहभागी करून घेण्याचे प्रयत्न महापालिका आरोग्य व पर्यावरण विभागाकडून मोठ्या सोसायट्यांना त्यांचा ओला कचरा कंपोस्ट करून जिरविण्यासाठी प्रोत्साहित करण्याची मोहीम राबविली जात आहे. प्रशासनाच्या आवाहनाला हाऊसिंग सोसायट्यांकडून प्रतिसाद मिळत आहे. भविष्यात जास्तीत जास्त सोसायट्यांना यात सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.
>
> **-विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त**

# वाकड हिंजवडी मार्गावर गर्दीच्या वेळी तीन मार्गिका

## पोलीस आयुक्तांकडून पाहणी केल्यानंतर निर्णय

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञाननगरीतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाकड-हिंजवडी मार्गावर सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी तीन मार्गिका केल्या जाणार आहेत.**



यासाठी रस्त्यात असलेले दुभाजक काढले जाणार आहेत. हा बदल प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी वाकड आणि हिंजवडी येथे पाहणी दौरा केला. यापूर्वी केलेल्या पाहणीत आयुक्तांनी प्रशासनाला सूचना दिल्या होत्या. त्याबाबत आढावा घेऊन सध्याच्या वाहतूक कोंडीची कारणे जाणून घेतली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

### येथे बदल करण्यात आले

सकाळी ८ ते दुपारी १२ वाकड-हिंजवडी पूल एकेरी असेल. वाकड ते हिंजवडीसाठी तीन मार्गिका आणि हिंजवडी ते वाकडसाठी एक मार्गिका असेल. सकाळी हिंजवडी ते वाकड जाणाऱ्यांनी उड्डाणपुलाचा वापर न करता डावीकडे वळून सयाजी अंडरपासमधून यू-टर्न घेऊन पुढे जावे.

भोसरी-वाकड बीआरटी आणि औंध-रावेत बीआरटी रस्त्याने वाकडमार्गे वाहने मोठ्या प्रमाणात हिंजवडीच्या दिशेने येतात. यामुळे हिंजवडीत येणाऱ्या मार्गावर मोठ्याप्रमाणात वाहतूक कोंडी होते.

काही दिवसांपूर्वी या मार्गावरून भुजबळ चौकातील उड्डाणपुलावर जाणाऱ्या दुचाकी वाहनांना सकाळी आणि संध्याकाळी प्रवेशास मनाई केली आहे. आता या मार्गावर आणखी बदल करून सकाळी, गर्दीच्या वेळी वाकड-हिंजवडी मार्गावर तीन मार्गिकांवर वाहतूक केली जाणार आहे. सायंकाळी, हिंजवडी-वाकड मार्गावर तीन मार्गिकांवर वाहतूक केली जाणार आहे. यासाठी रस्त्यात असलेले दुभाजक काढले जाणार आहेत. हा बदल प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येणार आहे. तसेच, रस्त्यामध्ये ठिकठिकाणी ‘साइनबोर्ड’ लावण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

> “ हिंजवडीतील पर्यायी रस्त्यासह अपूर्ण रस्त्यांची कामे लवकर पूर्ण करावीत. सकाळी वाकड ते हिंजवडी आणि संध्याकाळी हिंजवडी ते वाकड या मार्गावर तीन मार्गिकांवरून वाहतूक करण्याबाबत प्रायोगिक तत्त्वावर बदल केला जाणार आहे. त्यासाठी रस्त्यातील दुभाजक काढण्याच्या सूचना पोलीस आयुक्तांनी दिल्या आहेत.
>
> **–विवेक पाटील, पोलीस उपायुक्त, वाहतूक**

> “ हिंजवडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी उपाययोजना हाती घेतल्या आहेत. या भागातील कामे पूर्ण करण्यावर भर दिला.
>
> **–सुनील पवार, कार्यकारी अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिक**

# ‘डेरा’वाल्यांचे राजकारण जिंकत राहाते...




**‘डेरा सच्चा सौदा’चा प्रमुख गुरमित राम रहीम याला बलात्कार आणि अन्य गंभीर गुन्ह्यांसाठी झालेल्या कैदेतून नेमकी हरियाणातील मतदानाच्या दोन दिवस आधी सुट्टी मिळते, मग मतदान शांततेत होते आणि मजमोजणीच्या दिवशी दुपारपर्यंत, ‘हरियाणात सत्ताधारी भाजपलाच पुन्हा संधी’ अशा बातम्या येऊ लागतात...**

या घटनाक्रमाला निव्वळ योगायोग समजता येणार नाही, हे खरे असले तरी आमचा मुद्दा निराळा आहे. हा मुद्दा असा की, एकटादुकटा राम रहीम नव्हे तर हरियाणात गावोगाव पाळेमुळे रोवणारी ‘डेरा’ व्यवस्था राजकारणात उपयुक्त ठरते आहे. राम रहीमचा ‘डेरा सच्चा सौदा’ ही तशा प्रकारची सर्वात मोठी संघटना आहे, कबूल. पण हरियाणातील प्रत्येक खेड्यात काही ते पोहोचलेले नाही. तिथला स्थानिक डेरा त्या गावापुरताच असतो.शिखांचेही सात डेरे किंवा बंडखोर पंथ हरियाणा व पंजाबात असले तरी, अन्य कोणत्याही ‘डेरा’चे अनुयायी हे शीख नसतात. ते ग्रंथसाहिब मानत नाहीत. डेरा कितीही लहान क्षेत्रात आणि फक्त पाचेकशे गावकऱ्यांपुरताच असला, तरी प्रत्येक डेऱ्याला एक प्रमुख असतोच. या प्रमुखाला ते परमपूज्य मानतात. किंबहुना ग्रंथाऐवजी या जिवंत प्रमुखालाच



देवासमान मानणे हे डेरा संप्रदायाचे मोठे वैशिष्ट्य आहे. ‘डेरा’मुळात शिखांमधील बंडखोरीतूनच सुरू झाले असल्याचे इतिहास सांगत असला तरी हरियाणातले डेरे शिखांचे नाहीत. बहुतेक डेऱ्यांनी वंचित समाजघटकांनाही सामावून घेतल्याचा इतिहास आहे. अर्थातच, डेऱ्यांच्या इतिहासापेक्षाही आम्हाला रस होता तो त्यांच्या राजकीय-सामाजिक प्रभावाचा अभ्यास करण्यात. त्यातून असे निष्पन्न झाले की, पंचायत पातळीपासूनच राजकारणावर डेऱ्यांचा प्रभाव दिसतो.डेरासारख्या धार्मिक किंवा पंथीय संस्था स्वाभाविकपणे केवळ धर्मविचारापुरत्या न राहाता, आपापला सामाजिक प्रभाव टिकवून ठेवण्याचा आणि वाढवण्याचा प्रयत्न करतात. हा प्रभाव त्यांना देणगीदारांना आकर्षित करण्यास आणि त्यांचे कार्य टिकवून ठेवण्यास उपयोगी पडतो. प्रभाव कायम ठेवण्यासाठी त्यांचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे आध्यात्मिक मार्गदर्शनाव्यतिरिक्त शिक्षण, आरोग्य आदी सेवा देणे. पण त्यातून राज्याच्या सार्वजनिक सेवा तरतुदींवर कसा प्रभाव पाडतात हे समजून घेणे हेही आमच्या संशोधनाचे उद्दिष्ट होते. हा प्रभाव तीन कारणांमुळे वाढतो, असे आम्हाला आढळून आले.पहिले कारण म्हणजे राज्ययंत्रणेने जे काम करायला हवे होते पण केलेले नाही, ते डेरा स्वबळावर उभारतो. गावात प्राथमिक शाळा किंवा इंग्रजी शाळा नाही, उपचारकेंद्र नाही, या प्रकारच्या कामांपासून हे सुरू होते. दुसरे कारण म्हणजे सरकारी यंत्रणांना पैसा आणि मनुष्यबळ पुरवण्याची डेऱ्यांची तयारी. अशा स्वेच्छेने दिलेल्या मदतीचा मोठाचा उपयोग कोविड-काळात सरकारने करून घेतला होता. लोकांपर्यंत डेरा-स्वयंसेवक पोहोचत होते आणि त्यामुळे सरकारची क्षमता वाढत होती. तिसरे कारण यापेक्षा निराळे. ते असे की, डेरा कोणतेही समाजकार्य- विशेषत: सरकारी यंत्रणांना उपयुक्त ठरणारे कार्य- करत नसेल, तरीदेखील मोठ्या संख्येने लोक डेऱ्यात आहेत आणि दबावगट म्हणून ते काम करू शकतात, याची जाणीव स्थानिक सरपंच, ग्रामसेवक, आमदार अशा साऱ्यांनाच असते. त्यामुळे, डेरा स्वत:हून कार्य उभारत नसला तरी डेऱ्याचा दबावाने कामे होत राहातात. याशिवाय काही डेरे स्थानिक रहिवाशांना उत्पन्नाचे साधन किंवा एखादा जोडधंदा देतात, त्यातूनही प्रभाव वाढतोच. आमच्या अभ्यासातून, काहीसा चक्रावून टाकणारा एक निष्कर्षही निघाला. तो असा की, बहुतेकदा स्थानिक डेरे हे ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील कामांवर फार दबाव आणत नाहीत (तिथे गावातील विद्यमान राजकारण सुखेनैव सुरूच राहाते) पण हेच डेरे जिल्हा पातळीवर किंवा राज्य पातळीवर मात्र ‘ही कामे झाली नाहीत- ती कामे व्हायलाच हवी’ अशा मागण्यांसाठी जोरकसपणे दबाव आणतात. गावात शाळा वा प्राथमिक उपचार केंद्र उभारण्यासारख्या मागण्या राज्य सरकारकडूनच मंजूर करवून घ्याव्या लागतात, हेही यासंदर्भात खरे. पण या मागण्या डेरा करतो आहे म्हणून त्या मान्य व्हाव्यात.

## प्रासंगिक »

### स्वदेशीचा नारा

***केंद्रीय माहिती-प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांचा अशा प्रकारात पुढाकार असतो. ते नेहमी काही तरी वेगळं करून दाखवत असतात, त्याचा समाजमाध्यमावरून प्रचार-प्रसार***

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेला दणका असेल किंवा इतर कारणं असतील, केंद्र सरकारनं स्वदेशीचा नारा दिलेला आहे. प्रत्येक मंत्री काही तरी स्वदेशीपण दाखवू पाहात आहे. केंद्रीय माहिती-प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांचा अशा प्रकारात पुढाकार असतो. ते नेहमी काही तरी वेगळं करून दाखवत असतात, त्याचा समाजमाध्यमावरून प्रचार-प्रसार करतात. अलीकडे त्यांच्या प्रचाराचं उदाहरण म्हणजे ‘झोहो’. ही स्वदेशी कंपनी इंटरनेटवरून वापरता येणारे विविध ऑफिस व बिझनेस ॲप्स उपलब्ध करून देते.मायक्रोसॉफ्ट ३६५, गूगल वर्कप्लेस या बिझनेस ॲप्सला झोहो पर्याय ठरू शकतं. झोहो स्वदेशी असल्यामुळं त्याचं सगळं काम भारतात होईल. माहिती-विदा भारतातच सठावला जाईल. या झोहोचा वापर वैष्णव यांनी सुरू केल्यामुळं कदाचित झोहोचा वापर वाढण्याची शक्यता दिसू लागली आहे.

कोणत्याही भागात विजेची एकूण मागणी ही २४ तास समान नसते. संध्याकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत कमाल मागणी असते. रात्री १२ ते सकाळी ६ ती सर्वांत कमी असते. त्यानंतर ती वाढत जाते. मात्र कोळसाविद्युत प्रकल्प २४ तास चालवावेच लागतात. मागणीप्रमाणे चालू-बंद करता येत नाहीत.

## महाराष्ट्रहित पायदळी, पण कोणासाठी?

तसेच कोळशाच्या किमती वाढत जातात किंवा खरी-खोटी कारणे देऊन वाढविल्या जाऊ शकतात. त्यामुळे कोळसावीज प्रकल्पातील विजेची प्रतियुनिट किंमत कायम वाढती असते. प्रकल्पामुळे होणारे प्रदूषण तसेच मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठ्याची गरज हे घटक पर्यावरणास हानीकारक ठरतात.मात्र सौर ऊर्जा प्रकल्पाचा प्रत्यक्ष वापर हा भारतात एकूण क्षमतेच्या साधारणत: २५ टक्के, तर पवन ऊर्जा प्रकल्पाचा ३३ टक्के इतकाच असू शकतो. ही वेळ दिवसाची असल्याने त्यावेळी विजेचा पुरवठा हा मागणीपेक्षा जास्त असतो. दिवसातील सहा तास सौर ऊर्जा मागणीपेक्षा जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे ती साठविण्यासाठी बॅटरीव्यवस्थेची किंमतदेखील मोजावी लागते. मात्र सौर किंवा पवन ऊर्जा प्रकल्प एकदा स्थापित झाला की, त्याला कोणताही इंधनखर्च नसतो. एकदा त्याची किंमत ठरली की, त्यात एक नवा पैसादेखील वाढ प्रकल्पाच्या संपूर्ण



आयुष्यात म्हणजे किमान २५ वर्षांत गरजेची नसते. हे त्याचे महत्त्वाचे लाभ आहेत.महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने सौर वीज ५,००० मेगॅवॉट्स आणि औष्णिक (कोळसा) वीज १,६०० मेगॅवॉट्स, असा एकूण ६,६०० मेगावॉट्सचा संयुक्त प्रकल्प अदानी उद्योग समूहातील कंपनीला नुकताच दिला. हे कंत्राट देताना महाराष्ट्र सरकार मोदी, शहा यांच्या आदेशानुसारच कसे काम करत होते, याचा प्रशासकीय पुरावा म्हणजे निविदा काढण्याची प्रक्रिया आणि तारखा.

वीज कायदा २००३ आणि वीज नियामक आयोगाचे अधिकार याविषयीच्या कायदेशीर तरतुदीनुसार, अशा प्रकल्पाच्या कंत्राटासाठी निविदा काढताना वीज नियामक आयोगाची पूर्वसंमती घेणे, वीज वितरण कंपनीवर बंधनकारक होते. पण तरीही निविदा जाहीर करून कंपन्यांकडून प्रस्ताव मागविले १३ मार्च २०२४ रोजी आणि त्यासाठी मान्यतेचा अर्ज केला गेला १६ जून २०२४ रोजी! २५ जून रोजी त्याची तातडीची सुनावणी झाली, आणि १२ जुलै रोजी आयोगाने किंचितशी नाराजी दाखवत या निविदेला ‘पश्चातमान्यता’ दिली. त्यातही गंमत अशी की, या निविदा मागविताना सरकारला इतकी घाई होती की, केंद्राच्या ऊर्जा खात्याच्या मार्गदर्शक सूचनांपासून पूर्ण फारकत घेतली गेली आहे. कारण त्यात संयुक्त प्रकल्पाला मान्यताच नाही. या अभूतपूर्व प्रकाराचे स्पष्टीकरण देताना महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीने नियामक आयोगासमोर कबूल केले की, मे महिन्यात असणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होणार असल्याने त्यापूर्वी निविदा काढायच्या होत्या. म्हणून प्रथम आयोगाकडे अर्ज सादर केला नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

पुन्हा पुराच्या वेढ्यात

## सहा जिल्ह्यांत पावसाचे, वाहतूक ठप्प

# मराठवाडा पुन्हा पुराच्या वेढ्यात !

## २८५७ गावांत शेती बाधित झाली



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाड्यात सहा जिल्ह्यांत पुन्हा एकदा पावसाने थैमान घातले. शुक्रवारी रात्रीपासून सुरू झालेल्या पावसाने कर्नाटक, तेलंगणाकडे जाणारे मार्ग तसेच ग्रामीण भागातील रस्ते बंद झाले. नदी, नाले यांनी प्रवाह बदलले होतेच, शनिवारी पाणी पसरतच गेले. गोदावरी, हिंगोलीमध्ये कयाधू, बीड, लातूर आणि धाराशिवमधून जाणाऱ्या मांजरा नदीला पुन्हा पूर आला. या पावसाळ्यात मराठवाड्यातील २८५७ गावांत शेती बाधित झाली आहे. जूनपासून आतापर्यंत मराठवाड्यात पावसाने ९० बळी घेतले आहेत.**

अनेक भागांत राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकास बोलवावे लागले. पुन्हा एकदा परंडा तालुक्यास पुराने झोडपले. नांदेड, बीड शहरात पाणी घुसले. शाळा आणि अगदी पोलीस ठाण्यापर्यंत पाणी शिरले. मराठवाड्यात लातूर, नांदेड जिल्ह्यातील शाळा व शिकवणी वर्गास शनिवारी सुट्टी देण्यात आली होती. जायकवाडी धरणातून शनिवारी सायंकाळी ३७ हजार प्रति सेकंद घनफूट वेगाने पाणी सोडण्यात येत होते. पाण्याचा प्रवाह लक्षात घेऊन धरण ९६ टक्क्यापर्यंत कमी करण्यात आले आहे.गोदावरी आणि सिंदफना नदीमुळे परभणी व नांदेड जिल्ह्यात पूर आला असून, नांदेड-हैदराबाद या प्रमुख मार्गासह जिल्हाभरातील अनेक मार्गांवरील वाहतूक बंद झाली. कंधार तालुक्यातील सावळेश्वर येथे वीज कोसळून पांडुरंग निवृत्ती कदम (वय ४७) या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. मुखेड तालुक्यातील भवानी तांडा येथील शेतकरी जयराम धनाजी पवार यांच्या ३५ शेळ्या शुक्रवारी सायंकाळी वाहून गेल्या.बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील अहमदपूर राष्ट्रीय महामार्गावरील लाडझरी येथे पावसाचे पाणी जिल्हा परिषद शाळेत चार फूट पाणी साचले. बडेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतही पाणी शिरले. बीड शहरातील सखल भागामध्ये पाणी साचल्याने शहरालाच नदीचे स्वरूप आल्यासारखी स्थिती होती. बीड ग्रामीण पोलीस ठाण्यातही पाणी घुसले.हिंगोली जिल्ह्यात कयाधू नदीला पूर आल्याने सालेगाव-सांडस मार्गावर वाहतूक ठप्प झाली. इसापूर धरणातून पाणी सोडल्यामुळे पैनगंगा नदीला पूर आला आहे. पुसद-कळमनुरी-हिंगोली मार्गावरील शेंबाळ पिंपरीजवळील पुलावरून पाणी वाहत असल्याने सकाळी वसमत तालुक्यातील कुरुंदा गावातील एका वस्तीमध्ये घरे पाण्याखाली गेली. लातूर जिल्ह्यात चाकूर, निलंगा आणि औसा तालुक्यात पावसाचा जोर वाढला.

### मराठवाड्यात पावसाने ९० बळी

अनेक ग्रामीण रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यातील जवळपास १७ ग्रामीण रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले.बीड – माजलगाव – मांजरा धरणातून नदीपात्रात विसर्ग पुन्हा वाढविण्यात आला आहे. धरण पाणलोट क्षेत्रात पुन्हा जोरदार पाऊस झाला. पाण्याचा प्रवाह पाहता गेल्या दोन दिवसांपासून बंद असणारा विसर्ग पुन्हा सुरू करण्यात आला आहे.

# राज्याच्या ९० टक्के सेवा दोन महिन्यांत डिजिटल

## संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या '4 जी' तंत्रज्ञानाधारित सेवेचे लोकार्पण



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील नागरिकांना घरबसल्या आवश्यक सेवा देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. नागरिकांना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या ११०० सेवा ऑनलाइन आणि व्हॉट्सॲपवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. एकूण सेवांतील ९० टक्के सेवा पुढील दोन महिन्यांमध्ये डिजिटल करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'आत्मनिर्भर भारत' योजनेंतर्गत संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या '४ जी' तंत्रज्ञानाधारित सेवेचे लोकार्पण ओडिशा, झारसुगुडा येथे झाले. या अंतर्गत भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) ९२ हजार ६३३ टॉवरचे लोकार्पण करण्यात आले. त्यांपैकी ९ हजार २० टॉवर महाराष्ट्रात आहेत. येरवडा येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक कला मंदिर येथे यानिमित्ताने झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय युवक कार्य आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार मेधा कुलकर्णी, भारती एअरटेलचे संस्थापक अध्यक्ष सुनील मित्तल, 'बीएसएनएल'चे सरव्यवस्थापक हरिंदर कुमार, दूरसंचार विभागाचे विशेष महासंचालक आर. के. गोयल आदी या वेळी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, 'देशातील, तसेच राज्यातील लाखो लोकांपर्यंत ४ जी तंत्रज्ञान पोहोचणार असून, महाराष्ट्र शासनाच्या ११०० ऑनलाइन सेवा गावागावांत पोहोचविण्यात या कनेक्टिव्हिटीचा मोठा फायदा होणार आहे. या सेवेमुळे नागरिकांना बसल्या जागी त्यांच्या अर्जाची माहिती मिळेल. नागरिकांना आवश्यक असलेल्या ९० टक्के सेवा दोन महिन्यात डिजिटल केल्या जाणार आहेत. यामुळे या सेवांसाठी अर्ज दाखल केलेल्या नागरिकांना त्यांची फाइल नक्की कोठे आहे,

याची संपूर्ण माहिती मिळणार आहे. यात कोठेही दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात तक्रारदेखील दाखल करता येणार आहे.

या तंत्रज्ञानामुळे सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने करण्यात येणार आहे.

''बीएसएनएल नफ्यात आले असून, प्रगती करत असल्याचा आनंद आहे. स्वदेशी '४जी' तंत्रज्ञान विकसित करून 'डिजिटल भारता'कडे आपली वाटचाल सुरू आहे. 'बीएसएनएल'ची ही यशोगाथा उल्लेखनीय ठरेल,' असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

### 'कनेक्टिव्हिटी गरजेची'

गावांच्या विकासासाठी केवळ रस्तेच नव्हे, तर 'कनेक्टिव्हिटी'देखील तेवढीच महत्त्वाची असल्याचे लक्षात आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक गावात मोबाइल टॉवर कसा उभारला जाईल, यासाठी प्रयत्न केले. गावात इंटरनेट पोहोचते तेव्हा आपण गावाला जगाशी जोडत असतो. आरोग्य, शिक्षण क्षेत्रासाठी कनेक्टिव्हिटी महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांना हवामानाची, वातावरण बदलाची माहिती देऊन त्यांचे नुकसान टाळता येते. स्मार्ट व्हिलेजच्या सहाय्याने गावातील सर्व व्यवस्था उत्तम करता येतात. उद्योग, शेती, बाजारासाठी कनेक्टिव्हिटी महत्त्वाची आहे. त्यामुळे व्यवस्थेत परिवर्तन होण्याबरोबरच पारदर्शकता येते. तंत्रज्ञान ही भेदरहित व्यवस्था आहे,' असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## चेंगराचेंगरीत ३६ मृत्यू

## विजयच्या सभेतील घटना, मृतांमध्ये सहा मुलांचा समावेश

# तमिळनाडूतील चेंगराचेंगरीत 36 मृत्यू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तमिळनाडूच्या करुर येथे 'तमिलगा वेत्री कळ्ळगम' (टीव्हीके) पक्षाचे प्रमुख तथा अभिनेते विजय यांच्या सभेला प्रचंड गर्दी होऊन झालेल्या चेंगराचेंगरीत किमान ३६ जणांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. राज्याचे आरोग्य मंत्री मा. सुब्रमण्यम यांनी ही माहिती दिली.**

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक



मृतांमध्ये सहा लहान मुलांचा समावेश असून, या घटनेत डझनभर महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमींपैकी अनेक जण गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, या घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. विजय हे लोकप्रिय अभिनेते असून त्यांना पाहण्यासाठी सभेला मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. पोलिसांच्या माहितीनुसार करुर येथे सायंकाळी होणाऱ्या या सभेसाठी नागरिक दुपारपासूनच उपस्थित होते. सभेला अपेक्षेपेक्षा जास्त गर्दी होती. विजय यांचे आगमन झाल्यानंतर भाषणाला सुरुवात होताच सभास्थळी चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. यानंतर विजय यांनी आपले भाषण थांबवत पोलिसांना मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

नागरिकांची पळापळ सुरू झाल्याने अनेकजण एकमेकांच्या अंगावर कोसळून बेशुद्ध पडले. जखमींना तत्काळ करुर सरकारी रुग्णालयात दाखल केले. येथे डॉक्टरांनी ३५ जणांना मृत घोषित केले. तर ४५ हून अधिक जणांवर उपचार सुरू आहेत.दरम्यान, घटनेनंतर गर्दीला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर मंत्री, वरिष्ठ अधिकारी, पोलीस अधिकाऱ्यांनी करुरला धाव घेतली. मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी सचिवालयात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली. 'करुरमधील घटना चिंताजनक आहे. जखमींना सर्व मदत उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्यमंत्री, जिल्हाधिकारी यांना आदेशित केले आहे,' असे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी सांगितले. कोटतमिळनाडूतील करूर येथे घडलेली घटना अत्यंत दुःखद आहे. ज्या कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले, त्यांना माझ्या संवेदना. जखमी झालेले लवकर बरे व्हावेत,

अशी प्रार्थना करतो.अभिनय क्षेत्र गाजवून राजकारणात प्रवेश केलेला तमिळ अभिनेता थलपथी विजय याच्या शनिवारी संध्याकाळी करूर येथे झालेल्या सभेत चेंगराचेंगरी झाली आहे. यामध्ये किमान ३८ जणांचा मृत्यू झाला असून १०० हून

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची पोस्ट

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या चेंगराचेंगरीच्या घटनेवर दुःख व्यक्त केले आहे. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये ते म्हणाले, "तामिळनाडूतील करूर येथे एका राजकीय रॅलीदरम्यान घडलेली दुर्दैवी घटना अत्यंत दुःखद आहे. ज्या कुटुंबांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. या कठीण काळात त्यांना ताकद मिळो अशी प्रार्थना. जखमी पीडित लवकर बरे व्हावेत यासाठी मी प्रार्थना करतो."

अधिक जखमी झाले आहेत. सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विजयने तमिझगा वेत्री कळगम नावाच्या पक्षाची स्थापना केली आहे. तामिळनाडूत होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी त्याने जोरदार तयारी सुरू केली आहे. याचाच भाग म्हणून आज त्याने एक सभा आयोजित केली होती. या सभेसाठी हजारो लोक उपस्थित होते. याच दरम्यान गर्दी अनियंत्रित झाल्याने चेंगराचेंगरी झाली. परिस्थिती हाताबाहेर गेल्याने विजयने आपले भाषण मध्येच थांबवले. गोंधळाच्या दरम्यान गर्दीतून एक मूल बेपत्ता झाल्याचे समजताच, विजय लोकांना मदत करण्यासाठी पोलिसांना आवाहन करताना दिसला.चेंगराचेंगरीबद्दल दुःख व्यक्त करताना, मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी अधिकाऱ्यांना आणि मंत्र्यांना चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या पीडितांवर रुग्णालयात योग्य उपचार होत आहेत याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत.स्टॅलिन यांनी माजी मंत्री व्ही. सेंथिल बालाजी, आरोग्यमंत्री सुब्रमण्यम आणि करूर जिल्हाधिकारी यांना उपचारांबाबत आवश्यक सूचना दिल्या आहेत. स्टॅलिन यांनी या प्रकरणी अतिरिक्त पोलीस महासंचालकांशी चर्चा केली आहे. त्यांनी परिस्थिती हाताळण्यासाठी जनतेने डॉक्टर आणि पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.विजय हे तमिळ चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रिय व्यक्तिमत्त्व आहे आणि आता त्याने राजकारणात प्रवेश केला आहे.

# वांगचुक यांच्या पाकिस्तानशी संबंधांची चौकशी

## लडाखच्या पोलीस महासंचालकांकडून नव्याने आरोप

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लडाखच्या इतिहासात कधीही असा हिंसाचार घडला नाही असे सांगून सोनम वांगचुक यांचा पाकिस्तानशी संबंध असल्याच्या आरोपांची चौकशी सुरू आहे, अशी माहिती लडाखचे पोलीस महासंचालक एस. डी. सिंग जामवाल यांनी शनिवारी दिली.**



पर्यावरणवादी कार्यकर्ते व लडाख राज्यासाठीच्या आंदोलनात अग्रभागी असलेल्या वांगचुक यांना शुक्रवारी लेहमध्ये राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत (रासुका) अटक करण्यात आली. यानंतर त्यांना राजस्थानमधील जोधपूर येथील तुरुंगात पाठवण्यात आले.

लेह येथे झालेल्या पत्रकार परिषदेत जामवाल यांनी लेहमध्ये बुधवारी झालेल्या हिंसाचाराला वांगचुकच जबाबदार असल्याचा दावा केला. या हिंसाचारात चार जणांचा मृत्यू तर ९० हून अधिक जण जखमी झाले. 'वांगचुक यांच्या चौकशीचा तपशील सध्या उघड करता येणार नाही. ही प्रक्रिया सुरू आहे. त्यांचा इतिहास पाहिला तर ते सर्व 'यूट्यूब'वर उपलब्ध आहे.

अरब राष्ट्रांमध्ये झालेला उठाव आणि नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंकेतील अलीकडच्या अशांततेबद्दल त्यांचे (वांगचुक) भाषण चिथावणी देणारे ठरले,' असे जामवाल यांनी सांगितले. त्यांच्याविरुद्ध परदेशी निधी, 'परदेशी निधी नियमन कायद्या'चे (एफसीआरए) झालेले उल्लंघन आदींची चौकशी करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी आम्ही पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्याला अटक केली. जो वांगचुक यांच्या नेतृत्वाखालील सुरू असलेल्या निदर्शनांची माहिती आणि त्याच्या ध्वनिचित्रफिती सीमेपलीकडे पाठवत होता.

### 'गोळीबार करण्यास भाग पाडले'


'जामवाल यांनी वांगचुक यांच्या काही परदेश दौऱ्यांचा संदर्भ देत हे दौरे संशयास्पद असल्याचे म्हटले आहे. 'ते पाकिस्तानमध्ये 'द डॉन'च्या एका कार्यक्रमात सहभागी झाले होते आणि बांगलादेशलाही त्यांनी भेट दिली होती,' असे जामवाल यांनी पत्रकारांना सांगितले.पोलिसांना निदर्शकांवर गोळीबार करण्यास भाग पाडले गेले, अन्यथा संपूर्ण लेह खाक झाला असता', असे स्पष्टीकरण पोलीस महासंचालक जामवाल यांनी दिले.


# नवरात्रीचा आठवा दिवस महागौरी देवीचा!

नवरात्रीचा आठवा दिवस माँ दुर्गेची आठवी शक्ती महागौरीची पूजा केली जाते. महागौरी देवीची यथायोग्य पूजा केल्याने जीवनातील सर्व संकटे दूर होतात आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त होतो. चला जाणून घेऊया चैत्र नवरात्रीच्या आठव्या दिवशी पूजा, आरती आणि मंत्र कसे करावे.माँ दुर्गेची आठवी शक्ती महागौरीची पूजा केली जाते. नवरात्रीच्या आठव्या दिवसाच्या पूजेला विशेष महत्त्व आहे, या दिवशी कन्यापूजाही केली जाते. मातेचे काही भक्त ज्यांना पूर्ण ९ दिवस उपवास करता येत नाहीत, ते प्रतिपदा आणि अष्टमी तिथीला उपवास करतात. देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की आठव्या दिवशीची उपासना माँ दुर्गेची मूळ भावना प्रतिबिंबित करते आणि महागौरी नेहमी महादेवाच्या बरोबर राहते, म्हणून मातेचे एक नाव शिव आहे. महागौरीचे पूजन केल्याने सोमचक्र जागृत होते आणि तिच्या कृपेने प्रत्येक अशक्य कार्य पूर्ण होते. जाणून घेऊया माँ महागौरीचे रूप, नैवेद्य, आरती आणि मंत्र...

## असे माता महागौरीचे रूप आहे

» देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की माता महागौरीचे सर्व कपडे आणि दागिने पांढरे आहेत, म्हणून मातेला श्वेतांबरधारा असेही म्हणतात. त्यांच्या तपश्चर्येने त्यांना गौर वर्णाची प्राप्ती झाली होती. जन्माच्या वेळी ती आठ वर्षांची होती, त्यामुळे नवरात्रीच्या आठव्या दिवशी तिची पूजा केली जाते. त्यांच्या भक्तांसाठी ते अन्नपूर्णेचे रूप आहे. ती संपत्ती, वैभव आणि आनंद आणि शांतीची प्रमुख देवी आहे. सांसारिक रूपात त्यांचे रूप अतिशय तेजस्वी, कोमल, गोरे रंगाचे आणि शुभ्र वस्त्रे परिधान केलेले असते. देवीच्या एका हातात त्रिशूळ आणि दुसऱ्या हातात डमरू आहे. एक हात अभय आणि दुसरा हात वरमुद्रामध्ये आहे. देवी महागौरीला गाणे आणि संगीत आवडते आणि ती पांढऱ्या बैलावर स्वार होते. अष्टमीला मुलींची पूजा करण्याचीही परंपरा आहे. मात्र, काही लोक नवमीच्या दिवशी कन्येची पूजाही करतात. पण, अष्टमीच्या दिवशी कन्येची पूजा करणेही उत्तम. मुलींची संख्या 9 असल्यास उत्तम, अन्यथा पूजा दोन मुलींसोबतही करता येते. मुलींसोबत लंगुरा (बटूक भैरव) ही असावा. मुलींना घरी बोलावून त्यांचे पाय धुवून कुंकुम तिलक लावावा आणि नंतर पूजेमध्ये मुलींना हलवा, हरभरा, भाजी, पुरी इत्यादी वस्तू ठेवाव्यात आणि त्यांच्या क्षमतेनुसार दक्षिणाही द्यावी. यानंतर, संपूर्ण कुटुंबाच्या चरणांना स्पर्श करा आणि मातेचा जयजयकार करताना





## महागौरी हे नाव कसे पडले (माँ महागौरीची कथा)

» देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की, देवी पार्वतीचा जन्म राजा हिमालयापासून झाला होता. आईला तिच्या मागील जन्माच्या घटनांची जाणीव झाली जेव्हा ती फक्त 8 वर्षांची होती. वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी माता पार्वतीने भगवान शिवाला पती म्हणून प्राप्त करण्यासाठी तपश्चर्या सुरू केली. त्यामुळे नवरात्रीच्या अष्टमी तिथीला महागौरीची पूजा केली जाते. तपश्चर्येदरम्यान मातेने केवळ हवा पिऊन तपश्चर्या सुरू केली. माता पार्वतीने तपश्चर्येने मोठे वैभव प्राप्त केले होते, म्हणून माता पार्वतीचे नाव महागौरी पडले. तपश्चर्येमुळे माता पार्वतीचे शरीर काळे झाले होते. तेव्हा तिच्या तपश्चर्येने प्रसन्न झालेल्या भगवान शिवाने महागौरीला गंगा स्नान करण्यास सांगितले. जेव्हा माता पार्वतीने गंगेत डुबकी घेतली तेव्हा देवीचे एक रूप गडद वर्णाने प्रकट झाले, ज्याला कौशिकी म्हणून ओळखले जात असे आणि दुसरे रूप तेजस्वी चंद्रासारखे दिसले, तिला महागौरी असे म्हणतात. महागौरी आपल्या भक्तांची प्रत्येक इच्छा पूर्ण करते आणि त्यांच्या मार्गात येणारे अडथळे दूर करते. आईच्या कृपेने धन आणि धान्याची कधीच कमतरता भासत नाही.

## माँ महागौरी पूजा विधि

» नवरात्रीच्या अष्टमी तिथीचीही इतर तिथींप्रमाणे पूजा केली जाते. ज्याप्रमाणे सप्तमी तिथीला शास्त्रीय पद्धतीने मातेची पूजा केली जाते, त्याचप्रमाणे अष्टमी तिथीलाही मातेची पूजा केली जाईल. या दिवशी देशी तुपाचा दिवा लावताना आईच्या कल्याणकारी मंत्राचा जप ओम देवी महागोरियाय नमः आणि मातेला लाल चुनरी अर्पण करा. यानंतर रोळी, अक्षता, पांढरी फुले, नारळाची मिठाई इत्यादी पूजा साहित्य अर्पण करावे. अग्यारी करत असाल तर रोज चार लवंगा, बताशा, वेलची, हवन साहित्य इ. यानंतर संपूर्ण कुटुंबासह कापूर किंवा दिव्याने महागौरी आरती करा आणि मातेची स्तुती करा. यानंतर दुर्गा मंत्र, दुर्गा चालीसा, दुर्गा सप्तशती इत्यादी


पॅरा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धा जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीयांची सरस कामगिरी

# शीतल, तोमनचे ऐतिहासिक 'सुवर्ण'यश!

## सुवर्ण जिंकणारी पहिली तिरंदाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या १८ वर्षीय शीतल देवी आणि तोमन कुमार यांनी शनिवारी ऐतिहासिक कामगिरीची नोंद करताना पॅरा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत कम्पाऊंड प्रकारात सुवर्णपदकाची कमाई केली. भारताने एकाच दिवशी दोन सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्यपदके मिळविली.**



जम्मू-काश्मीरची शीतल पायाने लक्ष्यभेद करते. त्यामुळे हात नसूनही जागतिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती भारताची पहिली तिरंदाज ठरली आहे. यापूर्वी २०२२ मध्ये अमेरिकेच्या मॅट स्टुट्झमन याने पुरुष विभागात सुवर्णपदक मिळविले होते. मॅटही हात नसल्याने पायानेच वेध घेतो. शीतलने अंतिम लढतीत जागतिक क्रमवारीत अग्रस्थानावर असलेल्या तुर्कीयेच्या ओझनूर क्युर गिर्डी हिचा १४६-१४३ असा पराभव केला. त्यापूर्वी शीतलने तोमन कुमारच्या साथीत ग्रेट ब्रिटनच्या ग्रिनहॅम आणि नॅथन मॅकक्वीन जोडीचा १५२-१४९ असा पराभव करून मिश्र गटात कांस्यपदकाची कमाई केली. त्याचबरोबर महिला सांघिक प्रकारात शीतल आणि सरिता या भारतीय संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तुर्कीये संघाने १५२-१४८ अशा फरकाने विजय मिळवून सुवर्णपदक पटकावले.महिलांची अंतिम लढत चुरशीची झाली. पहिला सेट २९-२९ असा बरोबरीत राहिला होता. त्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये शीतलने तीनही वेळा १० गुणांची कमाई केली. ओनझूर मात्र अपयशी ठरली. यामुळे दुसऱ्या सेटला शीतलने ५९-५६ अशी आघाडी मिळवली. तिसऱ्या सेटला शीतलने अचूकता कायम राखत आघाडी ८८-८५ अशी वाढवली. चौथा सेट मात्र ओझनूरने २९-२८ असा जिंकून पिछाडी ११६-११४ अशी भरून काढली. मात्र, अखेरचा पाचव्या सेटला शीतलने तीन वेळा अचूक १० गुणांचा वेध घेऊन सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. या दोघींमध्ये २०२३च्या जागतिक स्पर्धेतही सुवर्ण लढत झाली होती. तेव्हा ओझनूरने १४०-१३८ असा विजय मिळविला होता.पुरुष विभागात राकेश आणि तोमन यांच्यातच अंतिम लढत असल्यामुळे सुवर्णपदक भारताचेच होते. दोन भारतीयांमधील लढतीत पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या राकेशला धनुष्यातील तांत्रिक बिघाडामुळे माघार घ्यावी लागली. यामुळे तोमन पदार्पणाच्या स्पर्धेतच सुवर्णपदकाचा मानकरी ठरली. कांस्यपदकाच्या लढतीत भारताच्या श्यामसुंदर स्वामीला ब्रिटनच्या नॅथन मॅकक्वीनकडून १४१-१४८ असा पराभव पत्करावा लागला.भारताच्या १८ वर्षीय शीतल देवी आणि तोमन कुमार यांनी शनिवारी ऐतिहासिक कामगिरीची नोंद करताना पॅरा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत कम्पाऊंड प्रकारात सुवर्णपदकाची कमाई केली. भारताने एकाच दिवशी दोन सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्यपदके मिळविली. जम्मू-काश्मीरची शीतल पायाने लक्ष्यभेद करते. त्यामुळे हात नसूनही जागतिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती भारताची पहिली तिरंदाज ठरली आहे. यापूर्वी २०२२ मध्ये अमेरिकेच्या मॅट स्टुट्झमन याने पुरुष विभागात सुवर्णपदक मिळविले होते. मॅटही हात नसल्याने पायानेच वेध घेतो. शीतलने अंतिम लढतीत जागतिक क्रमवारीत अग्रस्थानावर असलेल्या तुर्कीयेच्या ओझनूर क्युर गिर्डी हिचा १४६-१४३ असा पराभव केला. त्यापूर्वी शीतलने तोमन कुमारच्या साथीत ग्रेट ब्रिटनच्या ग्रिनहॅम आणि नॅथन मॅकक्वीन जोडीचा १५२-१४९ असा पराभव करून मिश्र गटात कांस्यपदकाची कमाई केली. त्याचबरोबर महिला सांघिक प्रकारात शीतल आणि सरिता या भारतीय संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तुर्कीये संघाने १५२-१४८ अशा फरकाने विजय मिळवून सुवर्णपदक पटकावले.महिलांची अंतिम लढत चुरशीची झाली. पहिला सेट २९-२९ असा बरोबरीत राहिला होता. त्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये शीतलने तीनही वेळा १० गुणांची कमाई केली. ओनझूर मात्र अपयशी ठरली. यामुळे दुसऱ्या सेटला शीतलने ५९-५६ अशी आघाडी मिळवली. तिसऱ्या सेटला शीतलने अचूकता कायम राखत आघाडी ८८-८५ अशी वाढवली. चौथा सेट मात्र ओझनूरने २९-२८ असा जिंकून पिछाडी ११६-११४ अशी भरून काढली.

### पुरुष विभागात सुवर्ण

मात्र, अखेरचा पाचव्या सेटला शीतलने तीन वेळा अचूक १० गुणांचा वेध घेऊन सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. या दोघींमध्ये २०२३च्या जागतिक स्पर्धेतही सुवर्ण लढत झाली होती. तेव्हा ओझनूरने १४०-१३८ असा विजय मिळविला होता. पुरुष विभागात राकेश आणि तोमन यांच्यातच अंतिम लढत असल्यामुळे सुवर्णपदक भारताचेच होते.

# सूर्याचं वक्तव्य, प्लेन क्रॅश हातवारे

## भारत-पाक सामन्यांदरम्यान नेमकं काय काय घडलं?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेतील सामन्यांपेक्षा भारत आणि पाकिस्तान संघांमधील वादामुळे नक्कीच सर्वांच्या लक्षात राहणारा असेल. भारत आणि पाकिस्तानचे संघ ४१ वर्षांत पहिल्यांदाच आशिया चषकाच्या अंतिम फेरीत भिडणार आहेत. यापूर्वी गट टप्प्यात आणि सुपर फोर फेरीत दोन्ही संघ भिडताना दिसले होते. दोन्ही सामन्यांमध्ये भारताने पाकिस्तानचा एकतर्फी पराभव केला होता.**




या दोन्ही सामन्यांदरम्यान अनेक वाद, घटना पाहायला मिळाले. या वादांमुळे सोशल मीडियावर विविध हॅशटॅग आणि घटना व्हायरल झाल्या होत्या. भारत-पाकिस्तान सामन्यांदरम्यान कोणकोणते विषयांवर चर्चा झाली होती.आशिया चषकात तर सुरूवातीला भारत आणि पाकिस्तान सामना खेळवला जाऊ नये अशी चाहत्यांची मागणी होती. त्यामुळे आशिया चषकातील भारत पाकिस्तान सामन्यावर बंदी असा हॅशटॅग सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यामुळे गट टप्प्यातील पहिला सामना बऱ्याच क्रिकेट चाहत्यांनी पाहिला नव्हता. पण सामन्यादरम्यान सूर्यकुमार यादवने पाकिस्तानविरूद्धचा विजय पहलगाम हल्ल्यातील मृत व्यक्तींच्या कुटुंबाना आणि भारतीय लष्कराला समर्पित केल्यानंतर चाहत्यांचा राग निवळला. भारतीय संघाने पाकिस्तानच्या खेळाडूंशी सामन्यानंतर आणि नाणेफेकीदरम्यान हस्तांदोलन न करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानविरूद्ध सामना जिंकल्यानं

पहलगाम हल्ल्यानंतर आणि ऑपरेशन सिंदूरनंतर आशिया चषक सामन्यादरम्यान भारतीय खेळाडूंनी घेतलेल्या या निर्णयाचे चाहत्यांनी कौतुक केलं.

### हारिस रौफचं ६-० हातवारे

रौफने भारताविरूद्ध सुपर फोरमधील सामन्यापूर्वी सराव सत्रादरम्यान ६-० अशी हाताने खूण करत सर्वांचं लक्ष वेधलं होतं. भारताने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर केलं आणि पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील अनेक दहशतवादी तळ उद्धवस्त केले. ज्यामुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
। रविवार ।
। दि. 28 सप्टेंबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## निवृत्त असलेले डॉ. नंदकुमार दहीभाते यांचे मार्गदर्शन

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतले बौद्धिक संपदा हक्कांचे!

### शिक्षण विश्व: माईर्स एमआयटी महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्कांवर तज्ज्ञाचे व्याख्यान

। आळंदी ।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**माईर्स एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग आणि रिसर्च सेल यांच्या संयुक्त विद्यमाने "शैक्षणिक संशोधनामध्ये बौद्धिक संपदा हक्कांची दिशा" या विषयावर तज्ज्ञ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सीएसआयआर – नॅशनल केमिकल लॅबोरेटरी पुणे येथे मूळ प्रधान तांत्रिक अधिकारी पदावर कार्यरत राहिलेले व सध्या निवृत्त असलेले डॉ. नंदकुमार दहीभाते यांनी मार्गदर्शन केले.**



या व्याख्यानाला विद्यार्थ्यांसह प्राध्यापक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ११५ विद्यार्थी आणि १५ प्राध्यापक सदस्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. डॉ. दहीभाते यांनी बौद्धिक संपदा हक्कांचे शैक्षणिक संशोधनातील महत्त्व, संशोधन सुरक्षित ठेवण्याचे उपाय आणि यामुळे विद्यार्थ्यांना व संशोधकांना होणारे फायदे याविषयी सविस्तर माहिती दिली. हे सत्र संवादात्मक पद्धतीने पार पडले असून सहभागींच्या शंका समाधानासही उपयुक्त ठरले.

कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय विभागाचे प्रमुख डॉ. राहुल बाराथे आणि रिसर्च सेलच्या प्रमुख डॉ. वैशाली खर्डेकर यांनी केले होते. सूत्रसंचालन डॉ. शीतल घोटेकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. जीवन कसबे यांनी केले. या उपक्रमास महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे व डॉ. अक्षदा कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# ग्रंथालय सप्ताहातून उलगडले पुस्तकांचे विश्व!

### शिक्षण विश्व: माईर्स एमआयटी महाविद्यालयात ग्रंथालय व राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाचे यशस्वी आयोजन

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**माईर्स एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने “पुस्तकांमधून जीवनाचा उलगडा करा” या विषयावर ग्रंथालय सप्ताह व एनएसएस सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**



या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे, चिकित्सक बुद्धीला चालना देणे, तसेच ज्ञान, प्रतिभा आणि कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे असे होते.

सप्ताहभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये इनोव्हेशन स्पर्धा, वाचन मॅरेथॉन, सर्जनशील लेखन स्पर्धा, स्ट्रीट प्ले आणि पोस्टर स्पर्धा यांचा समावेश होता. इनोव्हेशन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पुस्तक वा संशोधनावर आधारित नाविन्यपूर्ण कल्पना सादर केल्या. वाचन मॅरेथॉनमध्ये गटवाचन सत्रे व शांत वाचनाचे आयोजन करण्यात आले.

सर्जनशील लेखन स्पर्धेत ग्रंथालय संसाधनांवर आधारित लेखन सादर झाले. स्ट्रीट प्लेमध्ये मोबाईल व्यसन आणि व्यसनमुक्ती या ज्वलंत सामाजिक विषयांवर प्रभावी सादरीकरण झाले. पोस्टर स्पर्धेत विकसित भारत @2047, स्वच्छ भारत आणि वाचन संस्कृती यावर विचारमंथन झाले.

या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार रुजले, सर्जनशीलतेला चालना मिळाली आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली. महाविद्यालयातील २३४ विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे श्री.ज्ञानेश्वर विद्यालयातील आठवी, नववी व दहावीतील विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक मुंगसे यांचे व त्यांच्या शिक्षकवर्गाचे सहकार्य मोलाचे ठरले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी साहित्याची ओळख झाली. ‘रीडिंग रेस’, सर्जनशील लेखन, स्ट्रीट प्ले आणि पोस्टर स्पर्धा या उपक्रमांनी केवळ वाचन प्रोत्साहन नाही तर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि कलात्मक विकासाला बळकटी दिली. दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी विचारांवर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम इव्हेंट मॅनेजमेंटचा एक उत्कृष्ट नमुना ठरला.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक बी. बी. वाफारे, उपसंचालिका मानसी अतितकर व अक्षदा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. ग्रंथालय विभागप्रमुख राहुल बाराथे व राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख अरविंद वागस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशामध्ये निलेश मते, सारिका पडवळ, सुवर्णा सानप आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले.

"आठवणींच्या साक्षीने जीवनभर प्रेरणा
देणारी आमची प्रिय व्यक्ती"



भावपूर्ण
श्रद्धांजली

# कै.श्रीमती.शकुंतला माटे

## दशक्रिया विधी व श्रद्धांजली सभा

**रविवार, दिनांक 28 सप्टेंबर 2025, तिलांजली : 9.30 वाजता सुरुवात होईल**
**श्रद्धांजली सभा : 9.30 ते 11.00, स्थळ : मोरया गोसावी घाट, चिंचवड**

त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आपली उपस्थिती हीच खरी श्रद्धांजली !!

रोज विधी होत असल्यामुळे दशक्रिया विधीला जास्त वेळ लागणार नाही.
कृपया सर्वांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046